8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेध्नहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# लखन तुरे यांच्या मृत्यूनंतर संतापाचा उद्रेक

## आरोपींच्या अटकेसाठी मृतदेह पोलीस अधीक्षक कार्यालयात

### खाजगी सावकारीवर उपनिबंधक आणि जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका काय?

लखन तुरे यांच्यावर झालेला हल्ला खाजगी सावकारीच्या वादातून झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केल्यामुळे आता या प्रकरणाला केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत न पाहता जिल्ह्यातील अवैध सावकारीच्या प्रश्नाकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. खाजगी सावकारीचा आरोप समोर आल्यानंतर सहकार विभागाच्या उपनिबंधक कार्यालयाने या प्रकरणाची स्वतंत्रपणे दखल घेणार का? संबंधित व्यक्ती किंवा व्यक्तींकडून परवानाधारक सावकारीचा व्यवसाय केला जात आहे का? त्यांच्या नावावर सावकारीचा परवाना आहे का? कर्जवाटप, व्याज आकारणी आणि वसुलीची पद्धत काय आहे? याची तपासणी होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### परवानाधारक सावकारी की बेकायदा सावकारी?

महाराष्ट्रात सावकारी व्यवसायासाठी कायदेशीर चौकट अस्तित्वात असताना एखाद्या व्यक्तीने परवान्याशिवाय सावकारीचा व्यवसाय केला किंवा कर्जदारांकडून बेकायदेशीर पद्धतीने वसुली केली असल्यास संबंधित यंत्रणांनी त्याची चौकशी करणे अपेक्षित आहे. त्यामुळे लखन तुरे प्रकरणातील नातेवाईकांनी केलेल्या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी उपनिबंधक कार्यालयाने संबंधित व्यक्तींच्या सावकारी परवान्यांची माहिती तपासावी, तसेच त्यांच्या आर्थिक व्यवहारांची आणि कथित कर्जवसुलीच्या पद्धतीची चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

### गुन्हेगारीचा वाढता आलेख; पोलिसांचा धाक नेमका कुठे?

लखन तुरे यांच्या मृत्यूच्या घटनेने केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नाही, तर जालना शहर आणि जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीवरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शहरात दररोज मारहाण, हाणामारी, धमकी आणि इतर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या घटना घडत आहे. त्यातच काही दिवसांच्या अंतराने खून, प्राणघातक हल्ले यांसारख्या गंभीर घटना समोर येत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. एकीकडे अवैध धंदे, प्रतिबंधित गुटख्याची विक्री, अवैध वाळू उपसा आणि इतर बेकायदेशीर व्यवहारांविरोधात कारवाई होत असल्याचे पोलिसांकडून सांगितले जाते; मात्र दुसरीकडे अशा घटना पुन्हा पुन्हा घडत असल्याने कायद्याचा धाक निर्माण करण्यात यंत्रणा कितपत यशस्वी ठरत आहे? असा सवाल उपस्थित होत आहे.

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील ढवळेश्वर परिसरात ४ सप्टेंबर रोजी झालेल्या प्राणघातक हल्ल्याला आता धक्कादायक वळण मिळाले आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या लखन तुरे यांचा छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू असताना रविवारी, ६ सप्टेंबर रोजी मृत्यू झाला. तरुणाच्या मृत्यूची बातमी समोर येताच नातेवाईकांचा संताप अनावर झाला. आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी करत सोमवारी, ७ सप्टेंबर रोजी नातेवाईकांनी लखन तुरे यांचा मृतदेह थेट जालना पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात आणला.

'आरोपींना अटक झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही,' अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने पोलीस प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. मृतदेह पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात आणल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, ४ सप्टेंबर रोजी ढवळेश्वर परिसरात लखन तुरे यांच्यावर तीन ते चार जणांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांच्या शरीरावर गंभीर दुखापती झाल्याने सुरुवातीला जालना येथे उपचार करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच रविवारी लखन तुरे यांची प्राणज्योत मालवली. हल्ल्यात त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत होऊन ते तुटल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे. त्यामुळे हल्ल्याची तीव्रता आणि त्यामागील कारणांचा तपास करण्याची मागणी जोर धरत आहे.



*ढवळेश्वर हल्ला प्रकरणाला धक्कादायक वळण; खाजगी सावकारीच्या वादातून हल्ल्याचा नातेवाईकांचा आरोप; दोन आरोपी अटकेत, दोघे फरार*

लखन तुरे यांच्यावर झालेला हल्ला खाजगी सावकारीच्या वादातून झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. त्यामुळे या हल्ल्यामागे नेमके कोणते आर्थिक व्यवहार होते, त्यातून वाद कसा निर्माण झाला आणि हल्ल्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाची भूमिका काय होती, याचा सखोल तपास करण्याची मागणी होत आहे.

नातेवाईकांच्या आरोपांची पोलिसांकडून चौकशी होणे आणि हल्ल्याचे नेमके कारण तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. विशेषतः आर्थिक व्यवहारातून वाद निर्माण होऊन त्याचे रूप प्राणघातक हल्ल्यात आणि त्यानंतर खुनात झाले असेल, तर या प्रकरणाची व्याप्ती (पान २ वर)

### 'सावकारी'चा आरोप एफआयआरपुरता मर्यादित राहणार का?

लखन तुरे प्रकरणातील नातेवाईकांनी केलेला सावकारीचा आरोप तपासातून खरा ठरतो किंवा खोटा, हे तपास पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट होईल. मात्र असा गंभीर आरोप समोर आल्यानंतर संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी त्याची दखल घेणे आवश्यक आहे. पोलिसांनी हल्ल्यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावीच; परंतु त्याचबरोबर उपनिबंधक कार्यालयाने कथित सावकारी व्यवहारांची चौकशी करावी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाचा प्रशासकीय स्तरावर आढावा घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. एका तरुणाचा जीव गेला आहे. त्यामुळे 'हल्ला कोणी केला?' या प्रश्नासोबतच 'हल्ल्यामागे आर्थिक व्यवहार होते का आणि त्या व्यवहारांची कायदेशीरता काय?' या प्रश्नांची उत्तरेही प्रशासनाने शोधणे आवश्यक आहे.



श्री क्षेत्र विठ्ठल माळ येथे दैनिक युवा आदर्श संपादक दीपक शेळके यांनी भेट दिली असता कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गणेश बाप्पा लोखंडे, संजय शिंदे छायाचित्रात दिसत आहे.

# जालना-परतूर रस्त्यासाठी कारला येथे आमरण उपोषण

*खरपुडी-भाटेपुरी-वडीवाडी-कारला-ममदाबाद-चित्र वडगाव-रांजणी मार्गे परतूर जोडणारा रस्ता तातडीने मंजूर करून काम सुरू करण्याची नागरिकांची मागणी*

**जालना - प्रतिनिधी**

जालना ते परतूर दरम्यानचा महत्त्वाचा पर्यायी मार्ग अनेक वर्षांपासून रखडल्याने या मार्गावरील नागरिकांच्या संयमाचा आता अंत झाला आहे. खरपुडी, भाटेपुरी, वडीवाडी, कारला, ममदाबाद, चित्र वडगाव आणि रांजणी मार्गे परतूरला जोडणारा रस्ता तातडीने मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, या मागणीसाठी कारला येथे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. कारला येथील मारुती मंदिरासमोर श्री. रामराव कोल्हे यांनी रविवार, ६ सप्टेंबर २०२६ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. रस्त्याला मंजुरी देऊन काम प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या उपोषणाला परिसरातील विविध गावांमधून नागरिकांचा पाठिंबा मिळत असून, आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. खरपुडीपासून पुढे भाटेपुरी, वडीवाडी, कारला, ममदाबाद, चित्र वडगाव आणि रांजणी मार्गे परतूरला जोडणारा हा मार्ग पूर्ण झाल्यास जालना-परतूर प्रवासाचे अंतर सुमारे २० ते २५ किलोमीटरने कमी होऊ शकते, असा नागरिकांचा दावा आहे.



सध्या विरेगाव मार्गे जालना-परतूर प्रवास करावा लागत असल्याने नागरिकांना अतिरिक्त अंतर कापावे लागते. त्यामुळे वेळ, इंधन आणि वाहनांचा खर्च वाढतो. वर्षानुवर्षे हा प्रश्न प्रलंबित असूनही त्यावर ठोस निर्णय होत नसल्याने या मार्गावरील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

हा केवळ दोन शहरांना जोडणारा रस्ता नसून अनेक गावांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. त्यामुळे रस्त्याचे काम पूर्ण झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. सदर मार्गाला यापूर्वीच राज्य मार्गाचा दर्जा मिळालेला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. राज्य मार्ग क्रमांक २२३ (जालना-परतूर) या महत्त्वाच्या मार्गाशी संबंधित असलेल्या या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र विविध कारणांमुळे रस्त्याचे काम रखडले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शासनाच्या विविध स्तरांवर मागण्या करूनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याने आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. या (पान २ वर)

# पावसाअभावी खरिपाची पीके गेल्याने शेतकरी हवालदिल, तातडीने दुष्काळ जाहीर करुन आर्थिक मदत करा -भास्करराव अंबेकर

**जालना -प्रतिनिधी**

शिवसेना संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जिल्ह्यातील काही भागात भेटी देऊन खरीपाच्या पिक परिस्थितीची पाहणी केली असता सर्वत्र विदारक परिस्थिती दिसून आली. यावर त्यांनी जिल्ह्याच्या मा.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे निवेदनाद्वारे शेतकऱ्यांची स्थिती मांडून तात्काळ दुष्काळ जाहीर करून त्यांना आर्थिक मदती देण्याची मागणी केली. संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांनी निवेदनात पुढे म्हटले आहे की, जिल्ह्यात जवळपास मागील महिना-सव्वा महिन्यापासून पाऊस नसल्याने खरिपाची पिके पूर्णतः हातची गेली आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण भागात त्यामुळे अत्यंत विदारक परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी त्यामुळे पुरता हवालदिल झाला आहे. शासनाने आता अधिक वेळ न घालवता दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत करण्याची नितांत गरज आहे. आज जालना जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात पाऊस नसल्याने परिस्थिती विदारक असल्याने शेतकरी-कष्टकऱ्यांच्या चेहऱ्यावर अत्यंत उदासीनता दिसून येते. जिल्ह्यात मोठा पेरा असलेले सोयाबीन, कापूस, तूर, मुग ही पिके पूर्णतः हातची गेली. त्यामुळे शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते, औषधी, मशागत यावर केलेला सर्व खर्च वाया गेला आहे. आता सणासुदीचे दिवस आहेत शेतकऱ्यांच्या खिशात दमडीही नाही. त्यामुळे आता पंचनाम्याचा घोळ न घालता तातडीने दुष्काळ जाहीर करावा. तसेच आगामी काळात पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा याचे बिकट प्रश्न निर्माण होणार आहेत. करिता भविष्यातील संभाव्य अडीअडचणी लक्षात घेऊन त्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात. तर अनेक शेतकरी कर्जमाफी योजनेत पात्र होऊनही त्यांना अद्यापही त्याचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे तात्काळ अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देऊन त्यांना आधार देण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केली आहे.





श्री बडे बाबा मच्छिंद्रनाथ महाराज देवस्थान उद्योग गुरु विश्वनाथ जी महाराज यांची भव्य कावड यात्रा चार नऊ २०२६ शुक्रवार रोजी सकाळी आठ वाजता पाथरवाला गोदावरी नदीपासून यात्रा प्रारंभ झाली ७/ ९/ २०२६ वार सोमवार रोजी सायंकाळी पाच वाजता मुक्तेश्वर महादेव मंदिरात समाप्त झाली.

(छायाचित्र किरण खानापुरे)

# संपादकीय...

## आता राजकीय पक्षांनी मौन सोडावे

मराठा आरक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वाधिक संवेदनशील आणि गुंतागुंतीच्या प्रश्नांपैकी एक बनला आहे. गेल्या काही वर्षांत या प्रश्नावर आंदोलने झाली, सरकारांकडून विविध आश्वासने देण्यात आली, समित्या आणि आयोगांच्या माध्यमातून प्रक्रिया पुढे नेण्यात आली आणि न्यायालयीन पातळीवरही या प्रश्नाची कसोटी लागली. मात्र, आजही अंतिम आणि सर्वमान्य तोडगा निघालेला नाही. या पार्श्वभूमीवर भाजपचे माजी प्रदेश सरचिटणीस तथा आमदार संजय कुटे यांनी केलेले एक विधान राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी येण्यासारखे आहेमराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मतदारसंघनिहाय भूमिका न घेता प्रत्येक राजकीय पक्षाने आपली अधिकृत भूमिका महाराष्ट्राच्या जनतेसमोर स्पष्ट करावी. हा मुद्दा केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून बाजूला सारता येणार नाही. उलट, आरक्षणाच्या प्रश्नावर वर्षानुवर्षे सुरू असलेल्या राजकीय अस्पष्टतेकडे पाहता या मागणीवर गांभीर्याने चर्चा होणे आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक लोकप्रतिनिधीला आपल्या मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांची जाणीव असणे स्वाभाविक आहे. परंतु एखादा प्रश्न संपूर्ण राज्याच्या सामाजिक रचनेवर परिणाम करणारा असेल, तर त्यावर केवळ मतदारसंघातील राजकीय समीकरणांनुसार भूमिका ठरविणे योग्य आहे का, हा मूलभूत प्रश्न आहे. एका मतदारसंघात मराठा समाजाचे प्रमाण अधिक असल्याने आरक्षणाच्या मागणीला समर्थन आणि दुसऱ्या मतदारसंघात ओबीसी मतदारांचे प्रमाण अधिक असल्याने त्याच मागणीला विरोधअशी भूमिका जर प्रत्यक्षात घेतली जात असेल, तर त्यातून जनतेमध्ये संभ्रम निर्माण होणे साहजिक आहे. आरक्षण हा निवडणुकीतील घोषणेचा विषय नसून सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व, संविधानिक तरतुदी आणि कायदेशीर कसोटीशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाने सत्तेत असताना आणि विरोधात असताना वेगवेगळ्या भूमिका घेण्याऐवजी त्यांची दीर्घकालीन धोरणात्मक भूमिका काय आहे, हे जनतेला समजणे आवश्यक आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी भावनिक आणि सामाजिक वास्तवाशी जोडलेली आहे. शिक्षण, रोजगार, आर्थिक अडचणी, शेतीतील अनिश्चितता आणि स्पर्धात्मक संधींची कमतरता यांसारख्या अनेक प्रश्नांमुळे समाजातील मोठ्या वर्गामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मात्र या भावनेचे रूपांतर कायदेशीरदृष्ट्या टिकणाऱ्या आरक्षणात करण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी नाही. आरक्षण कोणत्या प्रवर्गातून? कोणत्या घटनात्मक आधारावर? उपलब्ध पुरावे कोणते? सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचे निकष काय? विद्यमान आरक्षणाच्या संरचनेवर त्याचा परिणाम काय? न्यायालयीन कसोटीवर हा निर्णय टिकेल का? या प्रत्येक प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आवश्यक आहे. म्हणूनच 'आरक्षण द्यायचे' की 'आरक्षण द्यायचे नाही' या द्वैतापलीकडे जाऊन 'आरक्षण कायदेशीरदृष्ट्या कसे टिकवायचे?' या प्रश्नावर चर्चा होणे अधिक महत्त्वाचे आहे. मराठा आरक्षणाच्या चर्चेत कुणबी नोंदींचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. राज्यात मोठ्या संख्येने कुणबी नोंदी सापडल्याची चर्चा होत आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातील नोंदींचाही संदर्भ दिला जातो. परंतु कोणताही आकडा समोर ठेवला की त्यामागील मूळ दस्तऐवज, नोंदींचे स्वरूप, कालखंड, वैधता, संबंधित व्यक्तींची ओळख आणि त्यावर प्रमाणपत्र देण्याची कायदेशीर प्रक्रिया स्पष्ट होणे आवश्यक आहे. एखाद्या जुन्या नोंदीत कुणबी उल्लेख आढळणे आणि त्या आधारे आजच्या काळात एखाद्या व्यक्तीला वैध प्रमाणपत्र देणे, या दोन वेगळ्या प्रशासकीय प्रक्रिया आहेत. त्यामुळे आकडेवारी राजकीय भाषणांचा भाग होण्यापेक्षा तिची अधिकृत पडताळणी आणि प्रक्रिया जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे. मराठा आंदोलनाच्या मागण्यांमध्ये 'हैदराबाद गॅझेट'चा संदर्भ महत्त्वाचा आहे. या दस्तऐवजाच्या आधारे कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्राचा प्रश्न पुढे आणला जात आहे. मात्र या संदर्भातही सरकारने गॅझेटचा कायदेशीर दर्जा काय, त्यातील नोंदींची प्रशासकीय ग्राह्यता कशी ठरवली जाणार आणि त्यावर आधारित प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया नेमकी काय असेल, हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. याबाबत सरकारकडून अस्पष्टता राहिली आणि आंदोलनकर्त्यांकडून वेगवेगळे दावे होत राहिले, तर संभ्रम वाढतच राहणार. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राजकीय पक्षांनी भूमिका जाहीर करावी, ही मागणी रास्त असली तरी सत्तेत असलेल्या सरकारची जबाबदारी त्याहून मोठी आहे. सरकारने जनतेसमोर स्पष्टपणे सांगितले पाहिजे की आरक्षणाच्या प्रश्नावर सध्या कोणती प्रक्रिया सुरू आहे, कोणते कायदेशीर पर्याय उपलब्ध आहेत, कोणत्या अडचणी आहेत आणि अंतिम निर्णयासाठी किती कालावधी आवश्यक आहे. 'लवकरच निर्णय', 'सकारात्मक निर्णय' किंवा 'शब्द दिला आहे' यापेक्षा कायदेशीर रोडमॅप जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. कारण आंदोलन संपविण्यासाठी दिलेले आश्वासन आणि न्यायालयात टिकणारा निर्णय यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. मराठा आरक्षणाच्या चर्चेत आणखी एक महत्त्वाचा पैलू आहेओबीसी समाजाची चिंता. मराठा समाजाच्या मागण्यांकडे सहानुभूतीने पाहणे जितके आवश्यक आहे, तितकेच विद्यमान ओबीसी आरक्षणाच्या हक्काबाबत निर्माण झालेल्या चिंतेकडेही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजामध्ये अन्यायाची भावना निर्माण होणार नाही, अशी कायदेशीर आणि सामाजिकदृष्ट्या टिकणारी व्यवस्था निर्माण करणे हे सरकारसमोरील खरे आव्हान आहे. हा प्रश्न 'मराठा विरुद्ध ओबीसी' अशा संघर्षात रूपांतरित होणे महाराष्ट्राच्या सामाजिक सलोख्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे राजकीय नेतृत्वाने भाषेतील संयम आणि धोरणातील स्पष्टता दोन्ही राखणे आवश्यक आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे हा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकीय अजेंड्यावर सातत्याने राहिला, हे नाकारता येणार नाही. आंदोलनामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला आणि समाजाच्या मागण्यांकडे व्यापक लक्ष गेले. मात्र आंदोलनाची ताकद ही अंतिम तोडग्याचा पर्याय नाही. त्यानंतर संवाद, दस्तऐवज, कायदा आणि प्रशासकीय प्रक्रिया यांची भूमिका सुरू होते. सरकार आणि आंदोलनकर्ते दोघांनीही जनतेसमोर उपलब्ध पुरावे आणि कायदेशीर पर्याय स्पष्ट केले तरच चर्चेला विधायक दिशा मिळेल. आमदार संजय कुटे यांनी उपस्थित केलेला सर्वात महत्त्वाचा प्रश्न हाच आहेप्रत्येक राजकीय पक्षाची अधिकृत भूमिका नेमकी काय? भाजपची भूमिका काय? कॉंग्रेसची काय? राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विविध गटांची भूमिका काय? शिवसेनेच्या विविध गटांची भूमिका काय? इतर पक्षांची भूमिका काय? ही भूमिका केवळ आंदोलनाच्या काळात किंवा निवडणुकीपूर्वी जाहीर होऊन उपयोग नाही. ती सातत्यपूर्ण, लिखित आणि धोरणात्मक असली पाहिजे.

# जिल्ह्यातील २ हजारशाळांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांचे सामूहिक प्रार्थना गीत

## *मानवता, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये रुजविण्यावर भर*

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये मानवता, संवेदनशीलता, परस्पर प्रेम, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि चांगले संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील शाळांमध्ये 'हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे' हे प्रार्थना गीत नियमितपणे गायिले जात आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या उपक्रमात जिल्ह्यातील २ हजार ३६१शाळांमधील ३ लाख ४६ हजार ३४० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

जिल्ह्यात जिल्हा परिषद, नगरपालिका तसेच विविध व्यवस्थापनांच्या एकूण २ हजार ४४४ शाळा आहेत. त्यापैकी २ हजार ३६१ शाळांमध्ये हे प्रार्थना गीत विद्यार्थ्यांकडून सामूहिकरित्या गायिले जात आहे. जिल्ह्यातील एकूण विद्यार्थी संख्या ३ लाख ७६ हजार २९४ असून, त्यापैकी सुमारे ९२ टक्के विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमाचा संदेश पोहोचला आहे.



**प्रार्थनेतून मूल्यशिक्षणावर भर**

'हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे' या गीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात माणुसकी, बंधुभाव, प्रेम, सहकार्य, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शालेय जीवनात मिळालेले संस्कार विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने पुस्तकी ज्ञानासोबतच मूल्याधारित आणि संस्कारक्षम शिक्षण देण्यावर भर देण्यात येत आहे.

दररोज सकाळी शाळेच्या प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांकडून हे गीत सामूहिकरित्या गायिले जाते. त्यामुळे शालेय वातावरणात सकारात्मकता निर्माण होण्यास मदत होत असून, गीतातील मानवतावादी विचार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी शिक्षकांकडूनही विविध उपक्रम राबविले जात आहेत.

विद्यार्थ्यांनी एकमेकांना मदत करणे, गरजू मित्रांना सहकार्य करणे, स्वच्छता राखणे, ज्येष्ठांचा सन्मान करणे, निसर्गाची काळजी घेणे तसेच समाजातील सर्व घटकांशी प्रेमाने व आदराने वागणे, या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांपर्यंतही हा उपक्रम प्रभावीपणे पोहोचविण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण, उत्तम संस्कार आणि सामाजिक जाणीव देण्यासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगिता भागवत यांनी सांगितले. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात यांनीही या उपक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाची माहिती दिली.

# जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खननातून ६०५ लाखांचा दंड; २०९ लाख वसूल

## २७१ प्रकरणांत कारवाई; ९९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात गौण खनिजांचे अवैध उत्खनन, वाहतूक आणि साठवणुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २७१ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, संबंधितांकडून ६०५.०७ लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे. त्यापैकी २०९.५४ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच ९९ व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महसूल, पोलीस आणि परिवहन विभागासह संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने संयुक्त तपासणी व कारवाई करण्यात येत आहे. तालुकानिहाय कारवाईत अंबड तालुका आघाडीवर असून, येथे ६८ प्रकरणांमध्ये कारवाई करून २२८.६१ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. त्यापैकी ५७.३२ लाख रुपयांची वसुली झाली असून २३ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जाफ्राबादमध्ये ४९ प्रकरणे नोंदवून १२९.६४ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला असून २६.५३ लाखांची वसुली करण्यात आली. या तालुक्यात २८ गुन्हे दाखल झाले आहेत. जालना तालुक्यात ३४ प्रकरणांत ६७.२९ लाखांचा दंड आकारून २५.३२ लाखांची वसुली करण्यात आली असून चार गुन्हे दाखल झाले आहेत. बदनापूरमध्ये १५ प्रकरणांत २६.५५ लाखांचा दंड आकारण्यात आला असून १.१५लाखांची वसुली झाली आहे. येथे ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घनसावंगीमध्ये १७ प्रकरणांत २९.९९ लाखांचा दंड आकारून २४.४३ लाखांची वसुली झाली असून १४ गुन्हे दाखल आहेत. परतूरमध्ये ३० प्रकरणांत २५.८४ लाखांचा दंड आकारण्यात आला असून १८.४९ लाखांची वसुली झाली आहे. येथे चार गुन्हे दाखल आहेत. मंठा तालुक्यात ३४ प्रकरणांत ४४.१७ लाखांचा दंड आकारून ३५.११ लाखांची वसुली करण्यात आली असून तीन गुन्हे दाखल झाले आहेत. भोकरदनमध्ये २४ प्रकरणांत ५२.९८ लाखांचा दंड आकारून २१.१९ लाखांची वसुली झाली असून १२ गुन्हे दाखल आहेत.

कारवाईदरम्यान १० वाळू, ४ वाहने तसेच इतर गौण खनिजाशी संबंधित साहित्य जप्त करण्यात आले आहे. अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येत आहे.

गौण खनिजांचे उत्खनन, वाहतूक किंवा साठवणूक करताना संबंधित व्यक्ती, वाहनमालक, वाहनचालक तसेच इतर जबाबदार व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम आणि शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कारवाई केली जाणार आहे. शासनास देय असलेली रॉयल्टी, दंड व इतर शुल्कांची वसुली करण्याबरोबरच प्रकरणाच्या स्वरूपानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी यांनी महसूल, पोलीस आणि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. अवैध उत्खनन अथवा वाहतूक आढळल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी आपल्या परिसरात गौण खनिजांचे अवैध उत्खनन, वाहतूक अथवा साठवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित तहसीलदार अथवा महसूल प्रशासनास माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

पान १ व ४ वरुन...

### लखन तुरे...

अधिक गंभीर असल्याचे मानले जात आहे.

सोमवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथे लखन तुरे यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह घेऊन थेट जालना येथील पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले.

आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी करत नातेवाईकांनी आक्रमक भूमिका घेतली. मृतदेह पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात आणल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी तातडीने तेथे दाखल झाले.

उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नातेवाईकांशी चर्चा केली. नातेवाईकांची भूमिका जाणून घेतल्यानंतर पोलीस अधीक्षकांचीही त्यांच्याशी भेट घडवून आणण्यात आली. आरोपींच्या अटकेबाबत आणि पुढील तपासाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत दोन आरोपींना अटक केली असून आणखी दोन आरोपी फरार असल्याचे सांगण्यात आले आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. मात्र, हल्ल्यातील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे. त्यामुळे सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईकांकडून केली जात आहे. घटनेनंतर चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे तसेच पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. सदर बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती.

लखन तुरे यांच्या मृत्यूने आता पोलिसांसमोर केवळ चार आरोपींना पकडण्याचे आव्हान नाही, तर या घटनेमागील संपूर्ण सत्य समोर आणण्याचेही आव्हान आहे. हल्ल्याचे नेमके कारण काय? खाजगी सावकारीचा त्याच्याशी संबंध आहे का? हल्ल्यात सहभागी असलेले सर्व आरोपी कोण? फरार आरोपी कधी जेरबंद होणार? आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी पोलिस प्रशासन काय ठोस उपाययोजना करणार? या प्रश्नांची उत्तरे आता जालना शहरातील नागरिकांना अपेक्षित आहेत.

#### कारवाई होते; पण गुन्हे थांबत का नाहीत?

गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करणे ही पोलिसांची कायदेशीर जबाबदारी आहे. परंतु गुन्हे घडण्यापूर्वी त्यांना प्रतिबंध घालणे, संवेदनशील भागांमध्ये प्रभावी गस्त वाढविणे, अवैध व्यवसायांच्या मुळावर घाव घालणे आणि गुन्हेगारी टोळ्यांवर वचक निर्माण करणे, हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब आहे. जालना शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या प्रतिबंधात्मक यंत्रणेची परिणामकारकता तपासण्याची वेळ आली आहे. एकीकडे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण दाखविले जात असताना दुसरीकडे गंभीर गुन्ह्यांना आळा का बसत नाही? हा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. लखन तुरे प्रकरणात दोन आरोपी अटकेत असले तरी उर्वरित आरोपी फरार राहणे आणि मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना न्यायासाठी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या दारात मृतदेह आणण्याची वेळ येणे, ही बाब प्रशासनासाठी निश्चितच गंभीर चिंतनाची आहे.

#### जिल्हाधिकाऱ्यांनी यंत्रणांचा समन्वय साधावा

या प्रकरणात पोलिस तपास सुरू असतानाच जिल्हाधिकारी प्रशासनानेही परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित विभागांची बैठक घेणे गरजेचे आहे. पोलिस विभाग, सहकार विभाग आणि महसूल प्रशासन यांच्यात समन्वय साधून जालना शहर व जिल्ह्यातील अवैध सावकारीबाबत व्यापक तपासणी मोहीम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. विशेषतः आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांना मोठ्या व्याजदराने पैसे देणे, त्यानंतर दबाव अथवा धमकीच्या माध्यमातून वसुली करणे अशा प्रकारच्या तक्रारी आहेत का, याचा प्रशासनाने आढावा घ्यावा.

#### दस्तुरखुद्द गृहमंत्र्यांनी लक्ष घालण्याची गरज

जालना जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीकडे आता राज्याच्या गृह विभागाने गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. दस्तुरखुद्द गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालना जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांचा स्वतंत्र आढावा घेऊन पोलिस यंत्रणेला स्पष्ट निर्देश देण्याची वेळ आली आहे, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे. शहरात गुन्हेगारीला खतपाणी घालणारे अवैध धंदे, आर्थिक वादातून होणारे हल्ले, मारहाणीच्या घटना आणि गंभीर गुन्ह्यांची मालिका रोखण्यासाठी केवळ घटना घडल्यानंतरची कारवाई पुरेशी नाही. गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक आणि सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे.

### जालना-परतूर...

मार्गावरील खरपुडीपासून रांजणीपर्यंतच्या गावांतील नागरिकांचे जालना आणि परतूर शहराशी विविध कारणांसाठी नियमित दळणवळण असते. शिक्षण, आरोग्यसेवा, शेतीमालाची विक्री, बाजारपेठ, रोजगार आणि प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना या दोन्ही शहरांवर अवलंबून राहावे लागते. रस्ता पूर्ण झाल्यास विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांकडे जाण्यासाठी, रुग्णांना रुग्णालयांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना बाजारपेठेत शेतीमाल घेऊन जाण्यासाठी मोठी सुविधा निर्माण होऊ शकते. सध्या खराब किंवा अपूर्ण मार्गामुळे नागरिकांना अतिरिक्त अंतराचा प्रवास करावा लागत असल्याने या रस्त्याची मागणी केवळ सुविधेपुरती मर्यादित नसून परिसराच्या विकासाशी निगडित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या रस्त्यावरील गावांचा समावेश तीन विधानसभा मतदारसंघ तसेच दोन लोकसभा मतदारसंघांमध्ये होत असल्याने या प्रश्नाकडे सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून एकत्रितपणे पाहण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. परतूर, जालना आणि घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील तसेच जालना आणि परभणी लोकसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे शासनाकडे पाठपुरावा करून या रस्त्याला अंतिम मंजुरी मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ''मतदारसंघ वेगवेगळे असले तरी रस्त्याचा प्रश्न एकच आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून नागरिकांच्या हितासाठी एकत्र यावे,'' अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली आहे. रस्त्याच्या मागणीसाठी यापूर्वीही पाठपुरावा आणि मागण्या करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र प्रत्येक वेळी आश्वासन मिळते; प्रत्यक्षात रस्त्याच्या कामाला सुरुवात होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. त्यामुळे यावेळी केवळ आश्वासन किंवा प्रस्तावाच्या हालचाली नकोत, तर रस्त्याला प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्याची तारीख जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. श्री. रामराव कोल्हे यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी या मार्गावरील विविध गावांतील नागरिक सहभागी होणार आहेत. प्रत्येक गावातील नागरिकांकडून साखळी उपोषण करण्यात येणार असून, रस्ता मंजूर होऊन प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला आहे. यामुळे येत्या काळात हे आंदोलन अधिक व्यापक होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने या आंदोलनाची दखल घेऊन तातडीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन रस्त्याची सद्यस्थिती, आवश्यक निधी, मंजुरी आणि काम सुरू करण्याच्या प्रक्रियेबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जालना-परतूर हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असून त्याचा फायदा अनेक गावांना होणार आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या रस्त्याचा प्रश्न आता केवळ स्थानिक नागरिकांच्या आंदोलनापुरता न ठेवता शासनस्तरावर तातडीने निकाली काढण्याची गरज आहे. एकीकडे ग्रामीण भागातील रस्ते विकासासाठी शासनाकडून विविध योजना आणि निधी उपलब्ध करून देण्याच्या घोषणा केल्या जात असताना दुसरीकडे महत्त्वाचा संपर्कमार्ग वर्षानुवर्षे रखडत असेल, तर त्याची कारणे सार्वजनिक होणे आवश्यक आहे. श्री. रामराव कोल्हे यांनी सुरू केलेले आमरण उपोषण आणि त्याला मिळणारा ग्रामस्थांचा पाठिंबा पाहता प्रशासनाने वेळीच सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. अन्यथा साखळी उपोषणाच्या माध्यमातून आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. ''रस्ता तातडीने मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरू करा; आश्वासनांवर आता विश्वास नाही,'' अशी स्पष्ट भूमिका कारला आणि परिसरातील नागरिकांनी घेतली आहे.

### कक्कया समाजाच्या...

हिने सोशल मीडियाचा चांगला वापर करण्याचे सांगितले.नतेस शेरखाने, विकी व्हटकर ,मनीषा कटके,नीला सोनवणे यांनीही मार्गदर्शन केले.

सचिन शेरखाने यांनी सांगितले की, ३० ऑगस्ट रोजी झालेल्या ज्येष्ठांच्या बैठकीत राजेश खंदारे, सूर्यकांत इंगळे, नर्सिंग कावळे यांनी ही संकल्पना मांडली. संजय कावळे म्हणाले, मराठा समाजाप्रमाणे आपणही एकत्र यायला हवे.

समारोपप्रसंगी राजेश खंदारे म्हणाले, गरीब विद्यार्थ्यांना मदत आणि तज्ञ मार्गदर्शनासाठी हे व्यासपीठ निर्माण केले आहे. ४ ऑक्टोबरची परिषद युवकांनीच यशस्वी करावी. सूर्यकांत इंगळे यांनी मुंबई, नवी मुंबई, ठाणे येथे पुढील बैठका घेण्याचे आवाहन केले.

### पर्यावरण संवर्धनासाठी...

आहे. अशा सामाजिक उपक्रमांतून समाजकार्याला नवी दिशा मिळते, असे ते म्हणाले. केवळ वृक्ष लागवड न करता लावलेली झाडे जगवणे आणि त्यांचे योग्य संगोपन करणे हाच आमचा खरा संकल्प आहे; आज लावलेली ही ५०० झाडे उद्याच्या हिरव्यागार जालन्यासाठी आशेचा नवा किरण ठरतील, असा विश्वास यावेळी क्लबचे अध्यक्ष आलोक नानावटी आणि पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### पोळा सणावर...

सण कसा साजरा करायचा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे,'' अशी खंत स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे वाढती महागाई यामुळे यंदाचा पोळा अत्यंत साधेपणाने साजरा करण्याची वेळ रामनगर व परिसरातील बळीराजावर आली आहे

### धनगर समाजाच्या...

अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. केंद्र व राज्य शासनाने आवश्यक समन्वय साधून सर्व कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करून धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा समाज बांधवांनी व्यक्त केली. यावेळी ''येळकोट येळकोट, जय मल्हार'' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. शासनाने या मागणीची तातडीने दखल न घेतल्यास आगामी काळात तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही धनगर समाज बांधवांनी दिला. या प्रसंगी बाबा आटोळे, शिवप्रकाश चितळकर, नितीन कानडे, कृष्णा गायके, सोपानराव आटोळे, गोविंद मदनूरे, दिगंबर सातपुते, मनोज मदनूरे, ॲड. मारोती आटोळे, अक्षय आटोळे यांची उपस्थिती होती.

### बालविकास प्राथमिक...

केले. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजीत चित्रकला स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. बालक मंदिर व इयत्ता पहिली, दुसरीच्या विद्यार्थ्यांनी विविध गीतावर नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी दहीहंडीतील मेव्याचा आनंद लुटला. सौ. नंदाताई बदनापूरकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका शुभांगी सोनार यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सहशिक्षिका संध्या मुंडे यांनी मानले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ढासळत चाललेली सामाजिक मूल्ये

महाराष्ट्र ही संतांची, विचारांची आणि समृद्ध सांस्कृतिक वारशाची भूमी आहे. या भूमीत साजऱ्या होणाऱ्या प्रत्येक सणामागे एक उदात्त हेतू, इतिहास आणि भक्तीभाव जोडलेला आहे. गोकुळाष्टमी आणि त्यानंतर होणारा दहीहंडीचा उत्सव हा याच थोर परंपरेचा एक अविभाज्य भाग आहे. भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांचे स्मरण करणे, तरुणांमध्ये एकीची भावना निर्माण करणे, साहसाला प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण समाजाने एकत्र येऊन आनंद साजरा करणे, हा या उत्सवाचा मूळ गाभा आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत आपल्या या पवित्र आणि ऐतिहासिक दहीहंडी उत्सवाला जे स्वरूप आले आहे, ते पाहून आज सुजाण नागरिकांच्या मनात तीव्र संताप आणि दुःख निर्माण होत आहे. एकीकडे आपण बाळकृष्णाच्या जन्माचा सोहळा साजरा करतो आणि दुसरीकडे उत्सवाच्या मंचावर अश्लीलतेचा नंगानाच सुरू असतो. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नेमकी कुठे चालली आहे? आणि याकडे डोळेझाक करून आपण आपल्याच हाताने आपल्या मूल्योंचा संहार करत आहोत का? हा आजचा सर्वात मोठा आणि गंभीर प्रश्न आहे.




नुकत्याच झालेल्या दहीहंडीच्या अनेक कार्यक्रमांमध्ये स्टेजवर स्त्रियांचे जे नृत्य प्रकार पाहायला मिळाले, ते अत्यंत क्लेशदायक आणि संस्कृतीला काळिमा फासणारे होते. त्या नृत्यांमध्ये कुठेही भक्ती नव्हती, कला नव्हती की खेळाचा उत्साह नव्हता. त्यात होत्या केवळ साऱ्या उपस्थित प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या कामुक हालचाली आणि अश्लील अंगविक्षेप. अवघा महाराष्ट्र ज्या दहीहंडीकडे एक साहसी खेळ आणि भक्तीचा उत्सव म्हणून पाहतो, तिथे अशा पद्धतीचे अश्लील डान्स करून काय साध्य झाले? अवघ्या काही सेकंदांच्या टाळ्या, शिट्ट्या आणि गर्दी गोळा करण्यासाठी आपल्या माता-भगिनींना अशा प्रकारे मंचावर नाचवणे आणि त्यांच्या अंगविक्षेपांचे प्रदर्शन मांडणे, ही आपली संस्कृती नक्कीच नाही. ज्या महाराष्ट्राने जिजाऊ, सावित्रीबाई आणि अहिल्याबाईंचे विचार जपले, त्याच महाराष्ट्रात सणांच्या नावाखाली स्त्रीच्या शरीराचे असे बाजारीकरण व्हावे, यासारखे दुसरे दुर्दैव नाही. सर्वात मोठी खेदाची गोष्ट म्हणजे, हे सगळे प्रकार ज्या मंचावर घडत असतात, तिथे मागे मोठ्या दिमाखात प्रमुख राजकीय नेत्यांचे, लोकप्रतिनिधींचे बॅनर्स आणि फोटो लावलेले असतात. अनेकदा तर हे नेते स्वतः समोर व्ही.आय.पी. सोफ्यावर बसून हा अश्लील डान्स उघड्या डोळ्यांनी पाहत असतात आणि त्याला दाद देत असतात. मतांचे राजकारण आणि तरुणाईची गर्दी आपल्याकडे खेचून घेण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये सध्या दहीहंडीच्या बक्षिसांची आणि चमचमाटाची मोठी स्पर्धा लागली आहे. या स्पर्धेतूनच संस्कृतीचा बळी दिला जात आहे. कोणत्याही राजकीय नेत्याला किंवा आयोजकाला या अश्लीलतेचा निषेध करावासा वाटत नाही, ना त्याला विरोध करावासा वाटत नाही. उलट, अशा नृत्यांचे आयोजन करून तरुणाईला आकर्षित करण्याचा उथळ प्रयत्न केला जातो. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची आणि मूल्यांची जपणूक करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, तेच नेते जर अशा कृत्यांना मूक संमती देत असतील, तर सामान्य जनतेने दाद कोणाकडे मागायची?या सगळ्या अश्लीलतेला आणि गोंगाटाला जोड मिळते ती म्हणजे डीजे () आणि अक्राळविक्राळ साऊंड सिस्टिमची. वास्तविक पाहता, प्रशासनाकडून आणि न्यायालयाकडून दरवर्षी ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले जाते. डीजेच्या अतिवापरावर मर्यादा घालण्याचे बोलले जाते. लोकांच्या आरोग्याला, लहान मुलांना, वृद्ध माणसांना आणि रुग्णांना या आवाजाचा किती त्रास होतो, यावर मोठ्या चर्चा रंगतात. पण प्रत्यक्षात काय घडते? दहीहंडीच्या दिवशी सर्व नियम धाब्यावर बसवून कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात डीजे वाजवले जातात. त्या डीजेवर कोणती गाणी वाजतात? देवांची भक्तीगीते किंवा स्फूर्तीगीते नव्हे, तर अत्यंत सुमार दर्जाची, अश्लील अर्थ असणारी आणि द्विअर्थी गाणी वाजवली जातात. अशा गाण्यांच्या तालावर मग स्टेजवर आणि स्टेजच्या खाली तरुण-तरुणी बेभान होऊन नाचतात. डीजेला एवढा विरोध असूनही, त्याचा एवढा अनिर्बंध वापर कोणाच्या बळावर होतो? याचे उत्तर उघड आहे राजकीय वरदहस्त आणि पैशांचा माज.हा जो काही नाच आणि अंगविक्षेपांचा प्रकार सुरू आहे, तो आपल्या समृद्ध संस्कृतीचा निव्वळ शो (प्रदर्शन) आणि उपहास करणारा आहे. आपण जगाला सांगतो की आमची संस्कृती महान आहे, पण सणांच्या दिवशी आपण जे प्रदर्शन मांडतो, त्याने आपण स्वतःलाच जगासमोर हास्यास्पद ठरवत आहोत. दहीहंडीचा मूळ उद्देश मानवी साखळी तयार करून, एकमेकांना सहकार्य करून, कष्टाने आणि कौशल्याने ती उंची गाठणे आणि हंडी फोडणे हा आहे. यात एकाग्रता, सराव, आणि क्रीडा संस्कृतीचा आदर असतो. परंतु, आज मूळ गोविंदा पथक आणि त्यांच्या साहसापेक्षा स्टेजवर चालणारा नंगानाच, अवाढव्य बक्षिसांची रक्कम आणि राजकीय नेत्यांची भाषणे यांनाच जास्त प्रसिद्धी मिळते. खरी क्रीडा संस्कृती मागे पडली आहे आणि तिची जागा या इव्हेंटबाजीने घेतली आहे.दहीहंडीतील या विकृतीची सावली येणाऱ्या गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सवावर (नवरात्रीवर) पडू नये, हीच आज सर्वात मोठी काळजी आहे.

दहीहंडी संपताच महाराष्ट्राचे सर्वात मोठे सार्वजनिक उत्सव म्हणजे गणेशोत्सव आणि पाठोपाठ येणारा दुर्गा उत्सव सुरू होतात. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात समाजाला एकत्र आणण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी आणि राष्ट्रभक्ती जागवण्यासाठी केली होती. तर दुर्गा उत्सव हा आदिशक्तीच्या, स्त्री शक्तीच्या जागरणाचा पवित्र सण आहे. परंतु, दहीहंडीत दिसलेला हा अश्लील गोंधळ, अंगाचा थरकाप उडवणारा डीजेचा आवाज आणि विकृत डान्स जर यापुढील सणांमध्येही सुरू राहिला, तर आपल्या सणांचे पावित्र्य पूर्णपणे नष्ट होईल. गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये किंवा नवरात्रीच्या गरबा आणि दांडियाच्या नावाखाली जर अशाच प्रकारे द्विअर्थी गाणी आणि अश्लील अंगविक्षेप होणार असतील, तर आपण पुढच्या पिढीला कोणता वारसा देणार आहोत? गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सवात असा कोणताही अश्लील गोंधळ दिसणार नाही, यासाठी आतापासूनच कडक पावले उचलण्याची गरज आहे.या पार्श्वभूमीवर, आगामी गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सव मंडळांसाठी तसेच स्थानिक प्रशासनासाठी काही कडक मार्गदर्शक तत्त्वे () आणि नियमावली लागू करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. सर्वप्रथम, मंडळांच्या मुख्य मंचावर किंवा विसर्जन मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचे अश्लील, द्विअर्थी आणि पाश्चात्त्य संस्कृतीला प्रोत्साहन देणारे डान्स प्रकार किंवा गाणी वाजवण्यास पूर्णपणे बंदी असायला हवी. दुसरे म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार आवाजाची मर्यादा ( ) राखणे बंधनकारक असावे. पारंपरिक ढोल-ताशे, लेझिम आणि स्थानिक लोककलांना प्राधान्य देऊन कानठळ्या बसवणाऱ्या डीजेच्या अवाजवी वापराला आळा घातला पाहिजे. यासाठी पोलिसांनी केवळ नोटीस न देता, नियम मोडणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.

मंडळांनी स्त्री शक्तीचा आणि संस्कृतीचा आदर राखणारे कार्यक्रम आयोजित करावेत. अश्लील इव्हेंटबाजी ऐवजी व्याख्याने, पथनाट्ये, पोवाडे, कायदेविषयक जागृती आणि आरोग्य शिबिरे यांसारख्या सामाजिक उपक्रमांवर भर द्यावा. उत्सवाच्या मंचावर देवाच्या मूर्तीपेक्षा राजकीय नेत्यांचे फोटो आणि बॅनर्स मोठे असणार नाहीत, याची काळजी मंडळांनी घेतली पाहिजे. नेत्यांनीही मंचावर उपस्थित राहताना कार्यक्रमाच्या गांभीर्याचे भान राखणे आवश्यक आहे. यासोबतच, प्रत्येक मंडळाने आपल्या परिसरात आणि मिरवणुकीत महिलांच्या सुरक्षेसाठी आणि हुल्लडबाजी रोखण्यासाठी स्वतःचे दक्षता पथक नेमावे, जे पोलिसांना सहकार्य करेल.आपण एका बाजूला स्त्री शक्तीची पूजा करतो, बेटी बचाओ, बेटी पढाओ च्या घोषणा देतो आणि नवरात्रीत देवीची मनोभावे आरती करतो. मग दुसरीकडे अशा सार्वजनिक उत्सवांमध्ये स्त्रीला केवळ एक आकर्षणाचे साधन म्हणून सादर केले जाते, तेव्हा समाजाची वैचारिक दिवाळखोरी स्पष्ट दिसते. जेव्हा एखादी स्त्री अशा मंचावर कामुक हालचाली करते, तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या हजारो तरुणांच्या मनात स्त्रीबद्दल कोणता आदर निर्माण होणार? उलट, यामुळे समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तीला आणि विकृतीला खतपाणी मिळते. तरुणांचे प्रबोधन करण्याऐवजी आपण त्यांना चुकीच्या मार्गाने उथळ आनंदाकडे ढकलत आहोत. या सर्व प्रकारांमुळे सुसंस्कृत आणि कौटुंबिक वातावरणातील नागरिक आता अशा सार्वजनिक सणांना जाणे टाळू लागले आहेत. जर सणांमधून कुटुंबच गायब झाले, तर तो सण सामाजिक कसा राहणार?आता वेळ आली आहे की आपण सर्वांनी, विशेषतः महाराष्ट्रातील सुजाण नागरिक, विचारवंत, गणेशोत्सव मंडळे, दुर्गा उत्सव समित्या आणि तरुणांनी यावर गंभीरपणे आत्मपरीक्षण केले पाहिजे. संस्कृती ही जपायची असते, तिचा बाजार मांडायचा नसतो. सणांमधील हा विकृत बदल जर आपण आजच रोखला नाही, तर येणारी पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. राजकीय नेत्यांनीही केवळ मतांच्या राजकारणासाठी सणांचे पावित्र्य नष्ट करणे थांबवले पाहिजे. आयोजकांनी व्यावसायिक नफ्याचा विचार सोडून उत्सवाच्या मूळ भक्तीभावाला आणि साहसाला प्राधान्य दिले पाहिजे. अश्लील नृत्याऐवजी महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला, पोवाडे, लेझिम, ढोल-ताशे आणि पथनाट्ये यांना मंचावर स्थान दिले, तर संस्कृतीचे रक्षणही होईल आणि तरुणांना योग्य दिशाही मिळेल.तसेच, डीजेच्या अवाजवी वापरावर आणि अश्लील गाण्यांवर समाजाने स्वतःहून बहिष्कार टाकला पाहिजे. जोपर्यंत आपण स्वतः अशा कार्यक्रमांना कडाडून विरोध करत नाही, तोपर्यंत हे थांबणार नाही. दहीहंडी, गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सव हे आपल्या अस्मितेचा, एकतेचा आणि आनंदाचा सण आहेत, त्यांचे हे पवित्र रूप टिकवून ठेवणे, हे प्रत्येक महाराष्ट्रीयन व्यक्तीचे कर्तव्य आहे.चांगले कार्यक्रम आयोजित करून, चांगली वाद्यांचा वापर करून, चला, या निमित्ताने एक पाऊल उचलू या आणि आपल्या आगामी सणांना विकृतीच्या विळख्यातून सोडवून पुन्हा एकदा संस्कृतीच्या उजेडात आणूया. कारण जर संस्कृती जिवंत राहिली, तरच समाज आणि राष्ट्र जिवंत राहील.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी समाज अधिक सुसंस्कृत, सुजाण आणि सक्षम बनावा, शिक्षणाच्या माध्यमातून मानवी कल्याण साधले जावे आणि प्रत्येकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, हा साक्षरता दिनामागील प्रमुख उद्देश आहे. अज्ञानामुळे होणारी पिळवणूक, फसवणूक आणि शोषण यापासून सामान्य माणसाची मुक्तता व्हावी आणि प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव व्हावी, यासाठी साक्षरतेला विशेष महत्त्व आहे. निरक्षरता ही केवळ अक्षरओळखीचा अभाव नसून ती व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक विकासातील मोठा अडथळा ठरू शकते. त्यामुळे जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या उद्देशाने युनेस्कोने ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जगभर या दिवसाच्या माध्यमातून साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले जाऊ लागले. साक्षरता म्हणजे केवळ एखाद्या व्यक्तीला लिहिता-वाचता येणे नव्हे. दैनंदिन जीवनाशी संबंधित माहिती समजून घेणे, परिस्थितीचे आकलन करणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे, स्वतःचे निर्णय स्वतः घेणे आणि समाजाच्या प्रगतीमध्ये योगदान देणे, ही साक्षरतेची व्यापक संकल्पना आहे. आजच्या डिजिटल युगात या संकल्पनेला आणखी व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. डिजिटल माध्यमांचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करता येणे, ऑनलाइन माहितीची सत्यता तपासणे आणि आर्थिक व्यवहारांबाबत आवश्यक ज्ञान असणे, हीदेखील आधुनिक साक्षरतेची महत्त्वाची अंग आहेत. शिक्षणाचे महत्त्व कोणाला नाही? शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे माणसामध्ये विचार करण्याची क्षमता विकसित होते. आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता निर्माण होते आणि आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव होते. त्यामुळे गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी साक्षरता हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी देशातील साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी अनेक योजना व अभियान राबविली. १९९१ मध्ये भारताचा साक्षरता दर सुमारे ५२ टक्क्यांवर पोहोचला, तर २०११ च्या जनगणनेनुसार तो ७४.०४ टक्के झाला. म्हणजेच स्वातंत्र्यानंतर भारताने साक्षरतेच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. मात्र शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण झालेले नाही. देशातील विविध राज्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण समान नाही. काही राज्यांनी साक्षरतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, तर काही राज्यांना अजूनही मोठा पल्ला गाठायचा आहे. ग्रामीण भागातील निरक्षरता, आर्थिक अडचणी, शाळाबाह्य मुले, मुलींच्या शिक्षणातील अडथळे, स्थलांतरित कुटुंबांची समस्या आणि शिक्षणातील असमानता ही आव्हाने अजूनही कायम आहेत. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाच्या वतीने सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना आणि नवभारत साक्षरता कार्यक्रम यांसारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. या योजनांचा उद्देश केवळ शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे नसून शिक्षणाचा दर्जा सुधारणे, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि प्रौढ निरक्षरांना साक्षरतेची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र साक्षरतेची जबाबदारी केवळ सरकारची नाही. पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजातील सुशिक्षित नागरिक यांनीही यामध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आपल्या परिसरातील एखादी निरक्षर व्यक्ती लिहिता-वाचता शिकली, एखादे मूल शाळेत गेले किंवा एखाद्या मुलीला शिक्षणाची संधी मिळाली, तरी तो साक्षर भारताच्या दिशेने टाकलेला महत्त्वाचा टप्पा ठरेल. आजच्या काळात 'शिक्षण सर्वांसाठी' ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता ती प्रत्यक्षात उतरविण्याची गरज आहे. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रत्येक प्रौढाला साक्षर होण्याची संधी आणि प्रत्येक नागरिकाला आधुनिक जगात सक्षमपणे वावरण्यासाठी आवश्यक ज्ञान मिळाले पाहिजे. साक्षर नागरिक हा केवळ स्वतःच्या कुटुंबाचा विकास घडवत नाही, तर तो समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही महत्त्वाची भूमिका बजावतो. साक्षरता वाढली की जागरूकता वाढते, जागरूकता वाढली की जबाबदार नागरिक घडतात आणि जबाबदार नागरिकांमुळे लोकशाही अधिक मजबूत होते. म्हणूनच साक्षरता ही केवळ शिक्षणाची बाब नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. भारताला विकसित आणि सक्षम राष्ट्र बनवायचे असेल, तर देशातील प्रत्येक नागरिक साक्षर आणि जागरूक असणे आवश्यक आहे. 'शंभर टक्के साक्षर, सक्षम आणि जागरूक भारत' हे केवळ सरकारचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक ध्येय झाले पाहिजे. शासनाच्या प्रयत्नांना समाजाची साथ मिळाली, तर निरक्षरतेवर मात करून साक्षरतेचे उद्दिष्ट नक्कीच साध्य करता येईल. जागतिक साक्षरता दिनानिमित्त प्रत्येकाने एक संकल्प करूयास्वतः साक्षर होऊया, इतरांनाही साक्षर करूया आणि ज्ञानाच्या प्रकाशाने समाजातील अज्ञानाचा अंधार दूर करूया!

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# अत्याधुनिक युगात वाढत्या गंभीर समस्या लक्षात घेता; सामाजिक दृष्ट्या साक्षर होणे गरजेचे

१९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे.कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारत पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त ७० टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या थांबविण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे.कारण बदलत्या काळानुसार १०० टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १०० टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत.त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण, भुकमरी,वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो. भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते.यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे.जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत. आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा!असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त ३० टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या ७९ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही.पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही. याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी, खान-पाण, रहाणीमान, देशाचा विकास, पारिवारिक सुख-दुःख, सुविधा, परिपक्वता, संस्कृती, आरोग्याची काळजी,अति दुर्गम भागातील विकास,सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता,भुस्खलन ,अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगलतोड व हिमालयातील विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत.

आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.ॲम्याझॉनसारखे जंगल जळने, वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले,जंगल संपदा मानवाने नष्ट केली, हिमालयात सुरूंग लावण्याचे काम मानवाने केले व नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वीचे संतुलन डगमगले आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे.

जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी, वण्यप्राणी) त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे.

यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल.चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**






जालना येथे मामा चौक पासून जय बजरंग गणेश मित्र मंडळ जालन्याचा राजा याची आगमन मिरवणुक उत्साहात ढोल ताशासह काढण्यात आली. छायाचित्र किरण खानापुरे

# शंकरनगर येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## शिक्षक दिनानिमित्त प्रा.बी. वाय. कुलकर्णी यांचे प्रबोधनपर व्याख्यान; शिक्षकांचा सत्कार

**मंठ - प्रतिनिधी**

शंकरनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त ज्येष्ठ विचारवंत प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांचे विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालकांसाठी प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे, तसेच शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संवेदनशीलपणे कार्य करावे, असे आवाहन केले.



कै. रंगनाथ कोंडीबा बोराडे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कन्या सौ. उर्मिला पोवळे (मुंबई) यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना सुमारे २० हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले.

कार्यक्रमास सरपंच प्रतिनिधी गणेशराव चव्हाळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष बोराडे, उपाध्यक्ष शफिक शेख, माजी अध्यक्ष विष्णुपंत बोराडे तसेच सौ. उर्मिला पोवळे, असेफ शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिक्षक दिनाचे औचित्य साधून शंकरनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक एस. के. चिंचोलकर, के. आर. अदाबे, ए. ए. पठाण, श्रीमती अनिता चव्हाण, जैस्वाल के. एम. तसेच पाटोदा येथील शिक्षक संतोष तोटेवाड व प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोद्याचे भूमिपुत्र प्रा. नारायणराव बोराडे होते. त्यांनी अध्यक्षीय समारोपातून शिक्षकांचे समाज घडविण्यातील योगदान अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षक, पालक आणि समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कक्कया समाजाच्या युवा परिवर्तन परिषदेसाठी पूर्वतयारी बैठक संपन्न

**मुंबई- दत्ता खंदारे /प्रतिनिधी**

कक्कया समाजाच्या वतीने ४ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय युवा परिवर्तन परिषदेच्या पूर्वतयारीसाठी रवि.दिनांक ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गणेश विद्या मंदिर,धारावी येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि मोठ्या संख्येने युवक-युवती उपस्थित होते.



बैठकीचे सूत्रसंचालन उलेश खंदारे यांनी केले. यावेळी प्रथमच व्यासपीठ पूर्णपणे युवक-युवतींसाठी खुले ठेवण्यात आले. ''तुम्हाला कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे,ते स्वतः येऊन सांगा,'' असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी युवक- युवतींनी मनमोकळेपणाने मते मांडली. आदित्य खंदारे म्हणाला, पालकांना मुले डॉक्टर, इंजिनिअर व्हावीत असे वाटते, पण आमचे मत विचारात घेतले जात नाही. प्रणव कळंबे याने / पेक्षा व्यवसायात अधिक पैसा आणि संधी असल्याचे सांगितले. सीए सफल खंदारे याने व्यावसायिक शिक्षण घेऊन तज्ञांच्या मार्गदर्शनाने व्यवसाय करण्याचा सल्ला दिला.

पृथ्वीराज कदम याने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यावर भर दिला, तर साई खरटमोल म्हणाला, मानसिक तणाव टाळण्यासाठी पालकांशी मनमोकळा संवाद गरजेचा आहे. डॉ. विनायक कोकणे यांनी पालकांच्या दबावामुळे मुलांमध्ये बीपी, हार्ट अटॅकचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त केली. सागर धडके यांनी धारावीतील छोट्या कारखान्यातून नवी मुंबईत कंपनी उभारल्याचा अनुभव सांगून चा वापर करण्याचे आवाहन केले.

दिव्या कदम, अर्बिता खंदारे यांनी पालक-पाल्यांतील कम्युनिकेशन गॅप आणि गुजराती- मारवाडी समाजाप्रमाणे मराठी युवकांनीही व्यवसायाकडे वळावे, असे मत मांडले. वैभवी पोळ (पान २ वर)

# पर्यावरण संवर्धनासाठी रोटरी क्लब मिडटाउनचा पुढाकार; एमआयडीसीत ५०० वृक्षांची लागवड

## माजी मंत्री राजेश टोपे यांची प्रमुख उपस्थिती

**जालना - प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन, वाढते प्रदूषण रोखणे आणि शहराला अधिक हरित व आरोग्यदायी बनविण्याच्या उदात्त हेतूने रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनने पुढाकार घेतला असून, त्या अंतर्गत सोमवार दि. ७ सप्टेंबर रोजी नवीन औद्योगिक वसाहतीत ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या व्यापक मोहिमेमुळे शहराच्या हरित पट्ट्यात मोलाची भर पडली आहे.



नवीन औद्योगिक वसाहतीतील मनीष बगडिया यांच्या भूखंडावर पर्यावरणपूरक ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमाचा शुभारंभ माजी मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी शरद टोपे, मनिष बगडिया, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनचे अध्यक्ष आलोक नानावटी, सचिव मनमोहन भक्कड, रोटरी सदस्य प्रतीक नानावटी, पंकज पाटनी, सूरज गेही, वीरेश बागडिया, अमित शाह, पियुष अग्रवाल, अक्षय जैस्वाल यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राजेश टोपे म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे आणि ती जगवणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज (पान २ वर)

# पोळा सणावर दुष्काळाचे सावट

## रामनगर आठवडी बाजारात शुकशुकाट; शेतकऱ्यांची खरेदीकडे पाठ

**सिंधीकाळेगाव । शाम गिराम**

बैलपोळा हा सर्जा-राजाच्या ऋणातून मुक्त होणारा शेतकऱ्यांचा सर्वात मोठा आणि आत्मीयतेचा सण. मात्र, यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा मोठा फटका या सणाला बसला आहे. जालना तालुक्यातील रामनगर येथील आठवडी बाजारात पोळा सणाच्या पूर्वसंध्येला खरेदीसाठी होणारी गर्दी ओसरली असून बाजारात कमालीचा शुकशुकाट पाहायला मिळत आहे. रामनगर येथील आठवडी बाजारात पोळ्याच्या पार्श्वभूमीवर बैलांना सजवण्यासाठी लागणारे मोरकी, कासरे, घुंगरू, रंगीबेरंगी दोऱ्या आणि विविध साहित्याची दुकाने थाटण्यात आली आहेत. मात्र, शेतातील पिकांची झालेली नासाडी आणि हातात रोख पैशांची टंचाई यामुळे शेतकरी खरेदीकडे पाठ फिरवत आहेत. विक्रेत्यांनी दुकाने सजवून ठेवली असली तरी ग्राहकांची संख्या कमी असल्याने व्यापारीही चिंतेत आहेत.''दरवर्षी पोळ्याच्या काळात या बाजारात पाय ठेवायला जागा नसायची. यंदा मात्र दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. बैलांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर असताना (पान २ वर)

# धनगर समाजाच्या एस टी आरक्षणासाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**जालना –प्रतिनिधी**

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती () आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी धनगर समाज बांधवांच्या वतीने आज सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी, जालना यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. धनगर समाजाचे नेते तथा आमदार गोपीचंद पडळकर यांच्या आवाहनानुसार राज्यभरातील जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयांसमोर आंदोलन करून शासनाला




निवेदन देण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून जालना येथेही धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. धनगर समाजाचा आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असून, समाजाच्या घटनात्मक हक्कांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणात राज्य शासनाने धनगर समाजाच्या आरक्षणाच्या बाजूने स्पष्ट व ठाम भूमिका पूर्ण कायदेशीर ताकदीने मांडावी, तसेच भविष्यातील परिस्थिती लक्षात घेऊन पर्यायी 'प्लॅन-बी' तयार ठेवावा (पान २ वर)

# जालना ते वैष्णोदेवी सायकल यात्रेला जय बजरंग फाउंडेशनकडून शुभेच्छांसह रवाना

**जालना । प्रतिनिधी**

जय बजरंग फाउंडेशनच्या वतीने चार युवकांना सायकलींचे वाटप करून जालना ते वैष्णोदेवी सायकल यात्रेसाठी रवाना करण्यात आले. विठ्ठल राजू जुंदारे, रामेश्वर प्रल्हादराव तपसे, राहुल तुकाराम गुंजाळ आणि करण अशोकआप्पा काटकर हे चार युवक वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जालन्यातून सायकलने प्रवासाला निघाले आहेत जालना येथील श्री गडबडेश्वर महादेव भजन मंडळी, बाबाजी खुंटी, कन्हैयानगर येथे सर्वप्रथम महादेव मंदिरात महाआरती करण्यात आली. त्यानंतर जय बजरंग फाउंडेशनच्या वतीने चारही सायकल यात्रेकरूंना शुभेच्छा देत यात्रेला सुरुवात करण्यात आली यावेळी जय बजरंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विपुल भैय्या राय, संस्थापक उपाध्यक्ष विनोद भैय्या राऊत, प्रांजल विपुल राय, जालना जिल्हाध्यक्ष उमेश कुटे, तसेच तोशु सिंग, गणेश पवार, संतोष सिंग, मनीष चंदनकर, सिद्धांत मोर, बबन दाभाडे, नगरसेवक योगेश भगत, नगरसेवक दीपक राठोड, भगु भगत, अक्षय पहाडिये, संतोष भोसले, गोविंद भगत, विनोद भगत, सौरभ भगत, शुभम भगत, पवन बटावाले, बिशन भगत, संकेत कटकडे, गणेश घोडके, यश घोडके, धनराज भगत, बाबा जांगडे, रामेश्वर शिंदे आदी उपस्थित होते धार्मिक श्रद्धा, सामाजिक बांधिलकी आणि युवकांच्या जिद्दीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जय बजरंग फाउंडेशनने या सायकल यात्रेला सहकार्य केले. चारही युवकांच्या या भक्तिमय सायकल यात्रेस उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या असून, त्यांचा प्रवास सुखरूप आणि यशस्वी होवो, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

# दिलीपराव देशमुख लातूरची 'ऑक्सफोर्ड डिक्शनरी' : ना. बाबासाहेब पाटील

**शि.अनंतपाळ । प्रतिनिधी**

लातूरच्या सहकार, बँकिंग आणि शिक्षण क्षेत्राला दिशा देताना प्रत्येक समस्येवर तोडगा आणि प्रत्येक क्षेत्रासाठी नवी संकल्पना देणारे दिलीपराव देशमुख म्हणजे लातूरची 'ऑक्सफोर्ड डिक्शनरी' आहेत, अशा शब्दांत सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. शिरूर अनंतपाळ येथील श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाच्या वतीने मांजरा परिवारातील कारखान्यांना उच्चांकी दर मिळवून दिल्याबद्दल दिलीपराव देशमुख यांचा गौरव करण्यात आला. यावेळी 'ग्रंथ रसिक' या गौरवग्रंथाचे प्रकाशनही झाले. त्याप्रसंगी ना. पाटील बोलत होते.



''दिलीपराव देशमुख यांच्याशी माझा ४० वर्षांचा स्नेह आहे. जिल्हा परिषद, बँक आणि सहकार क्षेत्रात आम्ही एकत्र काम केले. त्यांच्या सहवासाचा मला राज्यात सर्वाधिक लाभ झाला,'' असे सांगत ना. पाटील यांनी त्यांच्या कार्याचा प्रदीर्घ पट उलगडला.

एखादी संस्था उभी करणे सोपे असते; मात्र ती यशस्वीपणे चालवणे अवघड असते. ही अवघड प्रक्रिया देशमुख यांनी आपल्या दूरदृष्टीने सहज केली. त्यांनी आतापर्यंत ज्या घटकांना न्याय दिला, त्या सर्वांचा हा सत्कार आहे, असेही ना. पाटील म्हणाले. चाळीस वर्षांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'सहकार भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक एल. बी. आवाळे यांनी केले. गौरवग्रंथाचे संपादक जयदत्त जाधव आणि ग्रंथ संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बालाजी जाधव यांनी केले.

**'हे माझ्या कार्याची पावती'**

**''सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केलेल्या भावना हीच माझ्या कार्याची पावती आहे. शिरूर अनंतपाळ येथे झालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत भावनिक आहे. आतापर्यंत अनेक घटकांना न्याय देता आला; यापुढेही प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू ठेवू,'' अशी भावना दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केली.**

# बालविकास प्राथमिक शाळेत शिक्षकदिन व दहीहंडी उत्सव



**जालना - प्रतिनिधी**

कसबा भागातील श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन तसेच गोकुळ अष्टमी निमित्त दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या सचिव सौ. सुनंदाताई बदनापूरकर ह्या होत्या. यावेळी महिला मंडळाच्या कायदेशीर सल्लागार ॲड. सौ सुखदाताई देशपांडे. सदस्या सौ. सुलभाताई कुलकर्णी, सौ. सुषमाताई पायगव्हाणे, श्रीराम गीता बाल संस्कार केंद्राच्या केंद्रप्रमुख सौ. प्रतिभाताई रेंगे, सौ. स्नेहा आंबेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता परदेशी, ज्येष्ठ सहशिक्षिका छाया मुधोळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सहशिक्षिका श्रीमती पल्लवी सरकाटे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनीदेखील मनोगत व्यक्त (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.